

## महाराष्ट्र शासन

# महिला व बाल विकास विभाग



# "मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना"

### योजनेचे स्वरुप

प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या सक्षम बँक खात्यात DBT द्वारे दरमहा **रु.१५००/-** इतकी रक्कम दिली जाईल.

### योजनेचे लाभार्थी

महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ या वर्ष वयोगटातील विवाहीत, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता आणि निराधार महिला तसेच कुटुंबातील केवळ एक अविवाहित महिला.

### पात्रता

१. महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक.
२. राज्यातील विवाहीत, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता आणि निराधार महिला तसेच कुटुंबातील केवळ एक अविवाहित महिला.
३. किमान वयाची २१ वर्षे पूर्ण व कमाल वयाची ६५ वर्ष पूर्ण होईपर्यंत.
४. लाभार्थ्याचे स्वतःचे आधार लिंक असलेले बँक खाते असावे.
५. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापेक्षा जास्त नसावे.

### आवश्यक कागदपत्रे

१. आधार कार्ड (अर्जामध्ये आधारकार्ड प्रमाणे नाव नमुद करावे)
२. अधिवास प्रमाणपत्र, प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर महिलेचे (१५ वर्षापूर्वीचे रेशनकार्ड/१५ वर्षा पूर्वीचे मतदार ओळखपत्र/जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला) यापैकी कोणतेही एक.
३. महिलेचा जन्म परराज्यातील असल्यास पतीचे (१५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड/१५ वर्षापूर्वीचे मतदार ओळखपत्र/जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला/अधिवास प्रमाणपत्र) यापैकी कोणतेही एक.
४. वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापेक्षा कमी असणे आवश्यक,
   अ) पिवळी अथवा केशरी शिधापत्रिका असल्यास उत्पन्न प्रमाणपत्राची आवश्यकता नाही,
   ब) शुभ्र शिधापत्रिका असल्यास अथवा कोणतीही शिधापत्रिका नसल्यास वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापर्यंत असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.
५. अर्जदाराचे हमीपत्र
६. बँक खाते तपशील (खाते आधार लिंक असावे)
७. अर्जदाराचा फोटो (लाभार्थी महिलेचा)

### अपात्रता

१. ज्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख रुपयापेक्षा अधिक आहे.
२. ज्यांच्या कुटुबातील सदस्य आयकरदाता आहे.
३. ज्यांच्या कुटुबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ /भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत. तथापि, रु. २.५० लाखा पर्यंत उत्पन्न असलेले बाह्य यंत्रणाद्वारे कार्यरत असलेले कर्मचारी, स्वयंसेवी कामगार आणि कंत्राटी कर्मचारी पात्र ठरतील.
४. सदर लाभार्थी महिला शासनाच्या इतर विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजनेद्वारा दरमहा रु. १५००/- किंवा त्यापेक्षा जास्त रकमेचा लाभ घेत असेल.
५. ज्यांच्या कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार/आमदार आहे.
६. ज्यांच्या कुटुंबातील सदस्य भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या बोर्ड/कॉर्पोरेशन/उपक्रमाचे अध्यक्ष/उपाध्यक्ष/संचालक/सदस्य आहेत.
७. ज्यांच्याकडे चारचाकी वाहन (ट्रॅक्टर वगळून) त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावर नोंदणीकृत आहे.

**अर्ज करण्याची पद्धत** योजनेचे अर्ज नारीशक्ती दूत मोबाइल ॲपद्वारे/पोर्टलद्वारे ऑनलाइन भरता येतील.

**अर्ज करण्याची प्रक्रिया** १) पात्र महिलेस नारीशक्ती दूत ॲपद्वारे ऑनलाइन अर्ज स्वत: भरता येईल. त्याकरीता गुगल प्ले स्टोअर वरुन नारीशक्ती दूत हे ॲप डाऊनलोड करावे. सदर सुविधा केवळ ANDROID मोबाईल वर उपलब्ध आहे.

२) ज्या महिलेस ऑनलाइन अर्ज करता येत नसेल, त्यांना अंगणवाडी सेविका/पर्यवेक्षिका/मुख्यसेविका/सेतु सुविधा केंद्र/ग्रामसेवक/समुह संसाधन व्यक्ती (CRP)/आशा सेविका/वार्ड अधिकारी/CMM (सिटी मिशन मॅनेजर)/मनपा बालवाडी सेविका/मदत कक्ष प्रमुख/आपले सरकार सेवा केंद्र यांचेकडे अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध असेल. **या अर्जासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही.** ३) अर्जदाराचे नाव, जन्मदिनांक, पत्ता याबाबतची माहिती आधारकार्ड प्रमाणे अचूक भरण्यात यावी. बँकेचा तपशील व मोबाईल नंबर अचूक भरावा.

**या योजनेबाबतच्या अधिक माहितीसाठी महिला हेल्पलाइन टोल फ्री संपर्क क्रमांक 181**